जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१४/११/२०२३
## दि.१३/११/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ५३२/२०२३,भादविक ३०२ |
| **फिर्यादी** | संतोष गिनलवाड,वय-३२ वर्षे,रा.वडगाव-शेरी,पुणे |
| **आरोपीत** | शंभु दर्पी राम,वय ४७ वर्षे,रा.सनं.४३,संजय गांधी सोसयटी,वडगाव-शेरी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/११/२०२३ रोजी रात्रौ ००/०५ वा.संजय गांधी सोसायटी प्लॉट नं.१७२,वडगाव-शेरी,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मित्र बैजु लक्ष्मी मंडल,वय ३५ वर्षे,रा.संजय गांधी सोसायटी,प्लॉट नं.१७२,वडगाव-शेरी,पुणे हा याने नमुद इसम शंभु राम यास तुमने किराणा दुकानदार को, मुझे उधार सामान मत दो,एसे क्यो बोला, त्यावरुन दोघांचे मध्ये हमरी-तुमरी होवुन,शंभु राम याने बैजु मंडल याचेसोबत झालेल्या वादाचे कारणावरुन रागाचे भरात,फिर्यादी हे रहात असलेल्या बिल्डींगचे टेरेसवरुन बैजु यास जीवे ठार मारण्याचे उद्येशाने,त्यास बिल्डींगवरून खाली फेकुन देवुन जीवे ठार मारले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. घोरपडे ९४०३०४८७६७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ४२४/२०२३,भादविक ३९७,५०४,५०६,४२७,३४,क्रिमिनल अमेंडमेंट ॲक्ट कलम ७, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१) सह १३५ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय २६ वर्षे,रा.पाटील इस्टेट,शिवाजीनगर,पुणे |
| **आरोपीत** | १.गौरव विनोद मोरे,वय-१९ वर्षे,रा.भालेरावनगर,पिंपळे-गुरव,पुणे (अटक) व त्याचे इतर दोन साथीदार |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/११/२०२३ रोजी २१/३० वा.कुंदन प्लाझा बिल्डींगच्या समोर,जुना मुंबई-पुणे रोड, बोपोडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे कुंटूंबासह भिमाशंकर येथुन दर्शन घेवुन त्यांचे रिक्षामधुन घरी येत असताना,यातील नमुद इसम व त्याचे इतर साथीदार यांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांचे पायावर व रिक्षावर दगड मारुन,रिक्षाची काच फोडुन,हातामध्ये लोखंडी धारदार हत्यार घेवुन,त्यांना हत्याराचा धाक दाखवुन आवाज केला तर,येथेच खल्लास करीन अशी धमकी देवुन,फिर्यादी यांचे खिशातील पैशाचे पाकीट जबरदस्तीने काढुन घेवुन,पाकीटातील ३,२००/- रुपये रोख रक्कम पाकीटासह असा एकुण ३,७००/- रू किचे ऐवाजासह चोरी करून नेले आहे. तसेच त्यांचे हातातील धारधार हत्यार हवेत फिरवुन,आम्ही इथले भाई आहोत,मध्ये कोणी आलेतर कापुन टाकीन,आमचा नाद करायचा नाही असे जोर-जोरात ओरडुन सदर परिसरात दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आण्णा गुंजाळ ९९७०७४६४५६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १७४२/२०२३,भादविक ३०७,३२३,५०४,महा.पो.का.क.३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | चंदनसिंग जुनी,वय-४० वर्षे,रा.सर्वे नं.८६,बिराजदारनगर,वैदुवाडी,हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक १२/११/२०२३ रोजी रात्री ११/३० वा.सर्वे नंबर-८६,बिराजदारनगर,वैदुवाडी,हडपसर पुणे येथील दुर्गामाता मंदीरा समोर

**तपशिल** यातील फिर्यादी हे त्यांचा मुलगा गणेंश चंदनसिंग जुनी,वय-१९ वर्ष यास फिर्यादी यांचे शेजारी राहणारे यातील नमुद इसमाने त्याचे व गणेश यांचे आपसामधील किरकोळ वादाचा राग मनात धरुन,तुला माज लय आला आहे,तु आमच्या सोबत भांडण करतो का,आज तुझा गेम करतो तुला कायमचा संपवतो' असे म्हणुन त्यास शिवीगाळ करून,गणेश यास हाताने मारहाण करुन त्यास जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्याचे गळयावर व पोटावर चाकुने वार करून,त्यास गंभीर जखमी करून,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच फिर्यादी यांचे भांडणे सोडवण्यासाठी गेले असता,त्याने फिर्यादीस हाताने मारहाण करुन शिवीगाळ केली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. कवळे ९६८९९५६९९९

४

**पो.स्टे.गुरनं./कलम** चंदननगर पो स्टे ५३४/२०२३,भादविक ३०८,१४३,१४७,१४८,१४९,४२७,महा.पो.का.क.३७(१) १३५, आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७

**फिर्यादी** शरणप्पा यातनुर,वय ५४ वर्षे,रा.महीवीरंनगर लेन नं.१,वडगाव-शेरी,पुणे

**आरोपीत** सहा अनोळखी इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१३/११/२०२३ रोजी राञौ ०१/१५ ते ०२/०० वा.चे दरम्यान सत्यम सेरेनिटा सोसायटी माळवाडी,वडगाव-शेरी,पुणे तसेच वडगाव-शेरी गावठाण आजुबाजुचे परीसरा मध्ये

**तपशिल** यातील फिर्यादी हे सत्यम सेरेनिटा सोसायटी येथे राञपाळी ड्युटीवर,यातील नमुद इसमांनी मोटार सायकलवर येवुन सत्यम सेरेनिटा सोसायटी तसेच वडगाव-शेरी गावठाण आजुबाजुचे परीसरात येवुन मोठ-मोठ्याने आरडा-ओरडा करीत असल्याने,फिर्यादी यांनी त्यांना विचारणा केली असता,त्यांनी तुला माहीत आहे का,आम्ही वडगाव-शेरीचे भाई आहोत,तु आम्हाला बोलतो का असे म्हणुन फिर्यादी याचा जीव घेण्याचे उद्येशाने केबीनच्या व सोसायटीच्या साईन बोर्ड दगडाने फोडुन,तेथील नागरीकांना आम्ही वडगाव-शेरीचे भाई आहोत असे म्हणुन त्यांचे हातातील लोखंडी हत्यार व रॉड हवेत फिरवुन,सदर परिसरात भितीचे वातावरण निर्माण करुन,दहशत माजवुन,नागरीकांनी रोडवर पार्क केलेल्या वाहनांची तोडफोड करुन सदर वाहनांचे अंदाजे ९५,५००/- रुपयेचे नुकसान केले आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. पालवे ९५०३९४१५४२

५

**पो.स्टे.गुरनं./कलम** खडकी पो स्टे ४२५/२०२३,भादविक ३९४,४५२,३३६,५०४,५०६,३४,महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)१३५ प्रमाणे

**फिर्यादी** एक नागरीक,वय ३६ वर्षे,रा.घर नं. ४२३,दर्गा वसाहत,खडकी,पुणे

**आरोपीत** १.आसीफ जब्बार शेख,वय २५ वर्षे,रा.घर नं.४५२,दर्गा वसाहात,खडकी बाजार,पुणे २.कमलेश अरुण गायकवाड,वय-२५ वर्षे,रा.घर नं.३५६,दर्गा वसाहात,खडकी बाजार,पुणे (अटक) व त्याचे इतर दोन साथीदार

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक १३/११/२०२३ रोजी सकाळी ०६/३० वा. दर्गा वसाहत,खडकी,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी यांचे वस्तीत राहणारे आ.क्र.१ व २ तसेच त्यांचे इतर साथीदार यांनी आपसात संगनमत करुन,फिर्यादी व त्यांचे शेजारी राहणारे नागरीक तसेच फिर्यादी यांचे नातेवाईक यांना लोखंडी सळईने मारहाण करुन,फिर्यादी यांचे घरात घुसून,त्यांना शिवीगाळ करुन धमकी देवुन,फिर्यादीचे हातातील १,२००/- रुपये रोख रक्कम जबरदस्तीने काढुन घेवून,फिर्यादी व त्यांचे नातेवाईकांना दुखापत करण्यास कारणीभुत झाले आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. संतोष भांडवलकर ९७६६६९३३३६

६

**पो.स्टे.गुरनं./कलम** चतुःश्रृंगी पो स्टे ८२७/२०२३,भादविक ४०६,४२०,१७०

**फिर्यादी** एक नागरीक,वय ७४ वर्षे,रा.औंध,पुणे

**आरोपीत** मोटार साकलवरील एक अनोळखी इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक १३/११/२०२३ रोजी सकाळी ०७/४५ वा.चोंधे पार्क,नाकोडा ज्वेलर्स जवळ,औंध,पुणे येथे रोडवर

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पायी प्रभात फेरी मारून त्यांचे राहते घरी परत येत असताना,यातील नमुद अनोळखी इसमाने फिर्यादी यांचे पाठीमागुन त्यांचे जवळ येवून,औंध गावामध्ये चोरी झाली आहे,मी पोलीस आहे,तुम्ही दागिने घालुन फिरु नका असे सांगुन,त्यांचा विश्वास संपादन करुन,फिर्यादी यांचेकडील रुमाल घेवुन,त्यामध्ये फिर्यादी यांचेकडील एक सोन्याची चेन व दोन अंगठया १,००,०००/- रू किचे काढून रूमालात ठेवल्याचा बहाणा करुन,हातचलाखी करुन सदर दागिन्याचा अपहार करून,सदरचा ऐवज फसवणुक करुन नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. रुपेश चाळके ९५५२५२६६०३ |
| ७ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे १८१/२०२३,भादविक ३८० |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-६४ वर्षे,रा.एरंडवणे,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/११/२०२३ रोजी रात्री १२/३० ते पहाटे ०५/०० वा.चे दरम्यान स.न.२४,प्लॉट नं.१०, साई-श्रद्धा बंगला,पटवर्धन बाग,सोसायटी,एरंडवणे पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी यांचे राहते घरातील देवघरात लक्ष्मीपुजनासाठी ठेवलेले सोन्याचे दागिने व ४,००,०००/- रूपये रोख रक्कम असा एकुण ९,६३,०००/- रू किचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरट्याने,फिर्यादी यांचे राहते घराचे उघडया दरवाजावाटे आंत प्रवेश करून,फिर्यादी व त्यांचे घरातील इतरांची नजर चुकवुन,सदरचा ऐवज चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. सपताळे ९६२३७५०३२१ |
| ८ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १७४१/२०२३,भादविक ३८० |
| **फिर्यादी** | एक इसम,वय-४२ वर्षे,रा.वैदुवाडी,हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/११/२०२३ रोजी १९/०० वा. गणराज इस्टेट सोसायटी,शॉप नं.१४,वैदुवाडी हडपसर,पुणे येथील ज्वेलर्सचे दुकानात |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे गणराज इस्टेट सोसायटी,शॉप नं.१४,वैदुवाडी हडपसर,पुणे येथे ज्वेलर्सचे दुकान असुन,फिर्यादी हे त्यांचे पत्नीसह त्यांचे दुकानात असताना,यातील नमुद दोन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांचे ज्वेलर्सचे दुकानात सोन्याची चैन करण्याचे बहाण्याने येवुन, १,००,०००/- रूपये किची सोन्याची चेन दोन इसमांपैकी एका इसमाचे गळ्यात चेन घालण्यास सांगुन,आरश्या मध्ये कशी दिसते ते पाहण्याचा बहाणा करून,फिर्यादीचे दुकानातुन सदरची चेन चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, बारटक्के ७०३८९१२३४९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**